


# पारनेर दर्शन




वर्ष ३ अंक १९६, मंगळवार ८ जुलै २०२५ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# बिबटयांचा बंदोबस्त !


## खा. लंके यांच्या पाठपुराव्यानंतर केंद्राचे राज्याला ठोस निर्देश

अहिल्यानगर : प्रतिनिधी

**नगर जिल्ह्यासह राज्यभर वाढत्या बिबटयांच्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर नागरीकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या गंभीर विषयाची वेळोवेळी संसदेत तसेच केंद्र शासनाकडे ठामपणे मांडणी करणारे खासदार नीलेश लंके यांना मोठे यश मिळाले असून केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांनी महाराष्ट्र शासनाच्या वन विभागाला स्पष्ट व तातडीचे व अंमलबाजावणी योग्य निर्देश दिले आहेत.**

यासंदर्भात पाठपुरावा करताना खा. लंके यांनी मंत्री भूपेंद्र यादव यांना निवेदन सादर केले होते. त्यात नमूद करण्यात आले होते की, नगर जिल्ह्यातच नव्हे तर राज्यातील अनेक गावांमध्ये बिबट्यांच्या हल्ल्यांमुळे नागरिकांचा मृत्यू झाला आहे. अनेक शेतकरी, महिला, लहान मुले या हल्ल्यांना बळी पडले असून ग्रामीण भागात भीतीचे सावट पसरले आहे. या पार्श्वभूमिवर संवेदनशील भागांत त्वरित संरक्षण यंत्रणा उभारणे, पथके तैनात करणे आणि पीडीत कुटूंबांना तात्काळ मदत मिळावी अशी खा. लंके यांची ठाम मागणी होती.





### खा. लंके यांचा पुनः आग्रह

खा .नीलेश लंके यांनी केंद्रीय मंत्रयांच्या या ठोस हस्तक्षेपाचे स्वागत करत राज्य शासनाने सूचनांची तातडीने अंमलबजावणी करावी अशी मागणी केली आहे. ग्रामीण भागातील नागरीकांच्या सुरक्षेचा प्रश्न अत्यंत गंभीर असून यामध्ये कोणतीही दिरंगाई सहन केली जाणार नाही. वन विभागाने स्थानिक पातळीवर जागरूकता वाढवून  अधिक सजग आणि जबाबदार भूमिका घ्यावी.

खासदार नीलेश लंके
लोकसभा सदस्य

### प्रभावी अंमलबजावनीची अपेक्षा

ही कारवाई म्हणजे खा. नीलेश लंके यांच्या पाठपुराव्याचे फलीत असून ग्रामीण भागातील सामान्य नागरिकांच्या सुरक्षेसाठी केंद्र शासनाने उचललेले महत्वपूर्ण पावूल आहे. आता या निर्देशांची प्रभावी अंमलबवजाणी होणे हेच खऱ्या अर्थाने पुढील टप्प्यातील मोठे आव्हान ठरणार आहे.

### मंत्री यादव यांचे राज्याला निर्देश

- केंद्र सरकारने यासंदर्भात महाराष्ट्र राज्याच्या वन विभागाच्या प्रधान सचिवांना पत्र पाठवून विविध प्रकारचे निर्देश दिले आहेत.
- संवेदशील भागांची ओळख पटवावी.
- बिबट्याच्या सतत वावरामुळे उच्च धोका निर्माण झालेल्या गावांची यादी तातडीने तयार करावी.
- त्वरित प्रतिसाद पथके तैनात करावीत.
प्रशिक्षित वन कर्मचारी व पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांचा समावेश असलेली प्रतिसाद पथके तयार करून बिबटया हल्ल्यांना प्रतिसाद देणे अनिवार्य करावे.
- केंद्रीय मानक कार्यपध्दतीचे पालन करावं
मानव वन्यजीव संघर्षांच्या सर्व घटनांकवर कारवाई करताना केंद्राने जारी केलेल्या मानक कार्यपध्दतीचे काटेकोर पाल करण्यात यावे.
- राज्य व जिल्हास्तरीय समित्यांची निर्मिती
पीडितांना तात्काळ मदत, अनुग्रह निधीचे पुनरावलोकन व निर्णयासाठी स्थानिक पातळीवर प्रभावी समित्या गठण कराव्यात.
- ५-२४ तासांत मदतीची अंमलबजावणी
बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या किंवा जखमी झालेल्या व्यक्तींना २४  तासांच्या आत आर्थिक मदत देण्यासाठी प्रभावी प्रणाली कार्यान्वित करण्यात यावी.
- शारीरिक अडथळयांची उभारणी
बिबटयांना मानवी वस्तीतून रोखण्यासाठी सौर-उर्जेवर आधारित कुंपण, जैव कुंपन, किंवा संरक्षक भिंती उभारण्यासाठी केंद्राकडून निधीची तरतूद
- धोकादायक प्राण्यांविरोधात कायदेशीर पावले
वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२  च्या कलम ११/ १ नुसार मानवासाठी धोका निर्माण करणा-या प्राण्यांच्या शिकारीसाठी मुख्य वन्यजीव संरक्षक अधिकाऱ्यांना अधिकार

# कारखाना गैरव्यवहारप्रकरणी विधानसभेत आवाज उठवा

## | कारखाना बचाव समितीचे आ. दातेंना साकडे | एसआयटी मार्फत सखोल चौकशी व आरोपींच्या अटकेची मागणी

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर सहकारी साखर कारखान्याच्या विक्रीवेळी झालेल्या गंभीर गैरव्यहार प्रकरणी दोषींवर कठोर कारवाई व्हावी या मागणीसाठी पारनेर साखर कारखाना बचाव व पुनर्जीवन समितीने विधानसभा अधिवेशनात आवाज उठविण्याची विनंती करत आमदार काशिनाथ दाते यांना निवेदन सादर केले आहे.**





राज्य विधानसभेचे पावसाळी अधिवेशन सध्या सुरू असून या मंचावरून कारखाना विक्रीतील बेकायदेशीर व्यवहार, आरोपींचा बचावाचा प्रयत्न, पोलीस तपासातील अडथळे याकडे लक्ष वेधण्याची वेळ आल्याचे समितीचे म्हणणे आहे.

### गुन्हा दाखल, पण तपासात विलंब

पारनेर सहकारी साखर कारखान्याच्या खाजगीकरणाप्रकरणी पारनेर पोलीस ठाण्यात आगोदरच गुन्हा दाखल झालेला आहे. परंतु नगरच्या सत्र न्यायालयाने २४ जानेवारी २०२५ रोजी या तपासावर तात्पुरती स्थगिती दिली होती. त्यामुळे आरोपींवर कारवाई होणे थांबले होते. मात्र या प्रकरणातील आरोपींनी सत्र न्यायालयात केलेले अपील व पुनर्विचार अर्ज २ जुलै २०२५ रोजी फेटाळण्यात आले असून आता या प्रकरणातील तपास पुन्हा सुरू होण्यास कोणताही कायदेशीर अडथळा राहिलेला नाही असे समितीने स्पष्ट केले आहे.

### राज्य सहकारी बँक व खाजगी कंपनीचे संचालक आरोपी

या गुन्हयाच्या तपासात राज्य सहकारी बँकेचे दोन वरिष्ठ अधिकारी तसेच पुण्याच्या क्रांती शुगरचे नउ संचालक आरोपी आहेत. या सर्वांवर गंभीर स्वरूपाचे फसवणुकीचे, विश्वासघाताचे गुन्हे दाखल आहेत. त्यांनी कारखान्याची संपत्ती, मशिनरी, बेकायदेशीरपणे हस्तगत केली असल्याचा आरोप आहे.

### तात्काळ अटकेची गरज ; पोलिसांवर टाळाटाळीचा आरोप

समितीने असा आरोप केला आहे की, गुन्हा दाखल असूनही पोलिस आरोपींना अटक करण्यास टाळाटाळ करत आहेत. एवढेच नव्हे तर आरोपी कारखान्याच्या उरलेल्या मशिनरी नष्ट करण्याचे षडयंत्र रचत असून त्यासाठी हालचालही सुरु केली आहे. त्यामुळे या मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी तातडीने हस्तक्षेप करण्याची गरज आहे.

### विधानसभेत मुद्दा उपस्थित करण्याची विनंती

ही संपूर्ण परिस्थिती अत्यंत गंभीर असून पारनेर कारखान्याच्या अस्तित्वावरच गंडांतर आले आहे. या पार्श्वभुमीवर आमदार काशिनाथ दाते यांनी हा मुद्दा विधानसभेत प्रभावीपणे मांडावा व चौकशीस गती मिळवावी अशी अपेक्षा समितीने व्यक्त केली आहे.

### एसआयटी नेमा, ईडीकडे तपास द्या

कारखाना बचाव समितीने आपल्या निवेदनात म्हटले आहे की, हा गैरव्यवहार अत्यंत गुंतागुंतीचा व व्यापक आहे. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी विशेष तपास पथकामार्फत व्हावी, तसेच आर्थिक अनियमितता व मनी लॅन्ड्रिंगचा संशय असल्यामुळे हा तपास सक्तवसुली संचालनालय अर्थात ईडीकडे वर्ग करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली आहे.

# टाकळी हाजीत सैराट!

## दोन महिन्यांआधी आळंदीत प्रेमविवाह | रागातून दाजीवर हल्ला

शिरूर : प्रतिनिधी

**प्रेम कर भिल्लासारखं बाणावरती खोचलेलं मातीमध्ये उगवून सुद्धा मेघापर्यंत पोहोचलेलं... या कवितेच्या ओळी देणाऱ्या कुसुमाग्रजांचा हा महाराष्ट्र. पण पुरोगामी म्हणवल्या जाणाऱ्या आपल्या महाराष्ट्रात ऑनर किलिंगच्या घटना या वारंवार होत असतात. अशा अनेक घटनांनी राज्य वारंवार हादरलं आहे. अशीच एक घटना पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यात घडली आहे.**

पुण्यात प्रेमविवाह केल्याच्या रागातून एका तरुणावर थेट कोयत्याने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना टाकळी




हाजी (ता. शिरूर) येथे घडली आहे. या हल्ल्यात दत्तात्रय हौशीराम वाघ (वय २२,रा.तामकरवाडी-टाकळी हाजी, ता.शिरूर,जि.पुणे) हा तरुण गंभीर जखमी झाला आहे. टाकळी हाजी येथील कुंडाई मेन्स पार्लरमध्ये या भयानक हल्ल्याच थरार नाट्य घडले असून, दुकानाची तोडफोड करून दुकान मालकाच्या हातावर आणि पाठीवर लोखंडी कोयत्याने वार करण्यात आले आहेत. तर हल्ला करून पळून जाणाऱ्या दोघांना स्थानिक नागरिकांनी पकडले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दत्तात्रय वाघ हा आपली पत्नी स्नेहा हिच्यासह टाकळीहाजी येथे वास्तव्यास आहे. त्याचे याच परिसरात कुडांई मेन्स पार्लर हे सलून दुकान आहे. दोन महिन्यांपूर्वी दत्तात्रय आणि स्नेहा यांचा आळंदी येथे प्रेमविवाह झाला होता. मात्र, स्नेहाचे नातेवाईकांना हा प्रेम विवाह मान्य नव्हता. त्यामुळे दत्तात्रय याला वारंवार स्नेहाचा मावसभाऊ रवींद्र गायकवाड आणि इतर नात्यातील व्यक्तींनी जीवे मारण्याच्या

उर्वरीत पान ३ वर

# पांडुरंगाचं दर्शन घेऊन निघाले, वाटेत काळ आडवा आला

## श्रीगोंदा तालुक्यातील पती-पत्नीचा एकत्र अंत

इंदापूर : प्रतिनिधी

**आषाढी एकादशी निमित्त राज्यभरातील लाखो भाविक विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूरला जातात. सावळ्या हरीचे दर्शन घेऊन वर्षभरासाठी आपल्या कामासाठी ऊर्जा घेऊन परत येतात. मात्र, पुण्यात**



विठ्ठलाचे दर्शन घेऊन परतणार्या श्रीगोंदा

**तालुक्यातील वारकरी दाम्पत्याच्या एका भीषण रस्ते अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला आहे. त्यामुळे परिसरात मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे.**

पंढरपूरहून देवदर्शन करून गावाकडे परतत असलेल्या पती-पत्नीच्या दुचाकीला

उर्वरीत पान ३ वर

# बळीराजाचा आक्रोश विधानसभेत गगनभेदी !


## आ. काशिनाथ दाते यांनी वेधले शेतकऱ्यांच्या व्यथांकडे लक्ष

मुंबई : प्रतिनिधी

**राज्यातील शेतकरी नैसर्गिक आपत्ती, बोगस बियाण्यांचे संकट, अकार्यक्षम अंमलबजावणी, हमीभावतील अनियमितता यामुळे अडचणीत सापडला आहे. शेतकऱ्यांच्या या व्यथांचा आवाज शुक्रवारी विधानसभेच्या सभागृहात घुमला. आमदार काशिनाथ दाते यांनी शेतकरी बांधवांच्या व्यथा सभागृहात प्रभावीपणे मांडल्या. नियम २९३ अन्वये सभागृहात झालेल्या चर्चेत सहभागी होत आ. दाते यांनी शासनाच्या धोरणात्मक भूमिकेची मागणी केली.**

आपली भूमिका मांडताना आ. दाते म्हणाले, शेतकरी हा पुर्णतः निसर्गावर अवलंबून आहे. गेल्या काही वर्षात हवामानात झालेल्या बदलांमुळे शेती व्यवसाय धोक्यात आला आहे. यावष मे महिन्यातच पारनेर तालुक्यात सरासरीपेक्षा दुप्पट पाऊस झाला. मतदारसंघातील सुपा-शहाजापुर

उर्वरीत पान ३ वर




### बोगस बियाण्यांमुळे नुकसान

बोगस बियाण्यांचा मुद्दा सभागृहापुढे जोरकसपणे उपस्थित करत टाकळी ढोकेश्वर भागात काही कंपन्यांनी बोगस बियाणे विकल्याचे ते म्हणाले. शेतकऱ्यांनी पेरण्या करूनही उगवण न झाल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले. पठार भागात घेतल्या जाणाऱ्या वाटाण्याच्या पिकाचेही अतिवृष्टीमुळे पुर्ण नुकसान झाले असून शेतकऱ्यांपुढे दुबार पेरणीचे संकट उभे राहीले असल्याचे आ. दाते म्हणाले.

### सौर पंप योजनेवर आ. दाते आक्रमक

सौर उर्जा पंप योजनेमध्ये ठेकेदार व महावितरणच्या उदासीनतेवर आ. दाते यांनी यावेळी निशाणा साधला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ही चांगली योजना असली तरी अंमलबजावणीमध्ये गोंधळ आणि टाळाटाळ सुरू असल्याने त्याचा फटका शेतकऱ्यांना बसत असल्याचे दाते यांनी सांगितले.

### स्थैर्य निर्माण करणाऱ्या निर्णयांची गरज

नैसर्गिक आणि मानवनिर्मित कारणांमुळे शेतकरी संकटात आहे. त्यासाठी सरकारने केवळ तात्पुरते नाही, तर दीर्घकालीन, ठोस व धोरणात्मक उपाययोजना करणे अत्यावष्यक आहे. शेतकऱ्यांच्या जीवनात स्थैर्य निर्माण करणाऱ्या निर्णयांची आता वेळ आली आहे.

आ. काशिनाथ दाते, विधानसभा सदस्य

# महात्मा गांधींच्या पुतळ्याची विटंबना

## पुण्यातील धक्कादायक प्रकार | आरोपी ताब्यात, सुरक्षा यंत्रणांवर प्रश्नचिन्ह



पुणे : प्रतिनिधी

**पुण्यात एक अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक प्रकार घडला आहे. पुणे रेल्वे स्थानकासमोर असणाऱ्या राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्याची विटंबना करण्याचा प्रकार रविवारी (६ जुलै) रात्री उशिरा घडला. हातात धारदार कोयता घेऊन आलेल्या एका तरुणाने पुतळ्याच्या चौथऱ्यावर चढून, थेट पुतळ्याच्या छातीवर आणि पायावर हल्ला केला. या घटनेमुळे काही काळ रेल्वे स्टेशन परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.**

हल्लेखोर तरुणाने घातलेला केशरी कुर्ता आणि हातातील कोयता पाहून उपस्थित नागरिकांना भीतीने धक्का बसला. या प्रकाराची माहिती नागरिकांनी तातडीने रेल्वे पोलिसांना दिली. पोलिसांनी त्वरित कारवाई करत सुरज शुक्ला नावाच्या तरुणाला ताब्यात घेतले आणि पुतळ्याजवळील चौथऱ्यावरून खाली उतरवले. वेळीच हस्तक्षेप झाल्याने पुतळ्याचे मोठे नुकसान टळले.

प्राथमिक माहितीनुसार, सुरज शुक्ला हा मूळचा उत्तर प्रदेशातील असून सध्या पुण्यात नोकरीच्या शोधात राहत होता. त्याने हे कृत्य कोणत्या उद्देशाने केले, याचा तपास सुरू असून, त्याचे कोणत्याही संघटनेशी संबंध आहेत का, हेही तपासले जात आहे.

या घटनेमुळे सार्वजनिक ठिकाणी असणाऱ्या महत्त्वाच्या

उर्वरीत पान ३ वर



फॅशन | संसार | सौंदर्य
# सखी

# पावसाळ्यात साडी नेसताय?

**पाऊस सध्या जोमात सुरू आहे. पावसाळा सुरू झाल्याने, उन्हापासून काहीसा दिलासा मिळाला आहे. पावसाळ्यात आपण स्वतःच्या राहणीमानावर विशेष लक्ष ठेवतो. पावसाळ्यात कपड्यांविषयी बोलायला गेलं तर, या सीझनमध्ये लोक पाश्चात्य पोशाख घालणे पसंत करतात. मात्र, या सीझनमध्ये खरं तर तुम्ही वेगवेगळे लुक्स ट्राय केले पाहिजेत. ज्यांना या सीझनमध्ये साड्यांची आवड आहे, तर त्यासाठी तुम्ही सुंदर साड्यांचाही लुक्स ट्राय करू शकता. या हंगामात तुम्ही तुमच्या साडी कलेक्शनमध्ये काही रंगीबेरंगी साड्या जोडू शकता. तर आज आम्ही तुमच्यासाठी काही टिप्स घेऊन आलो आहोत ज्याद्वारे तुम्ही पावसाळ्यात तुमच्या साड्यांच्या कलेक्शनमध्ये भर घालू शकता आणि स्वतःचा वेगळा लुक्स ट्राय करू शकता.**




- हॅप्पी शेड्स निवडा : आजकाल पेस्टल रंग ट्रेंडमध्ये आहेत, त्यामुळे जरी तुम्हाला हे रंग कितीही आवडत असले, तरीही पावसाळ्यात तुम्ही ते खरेदी करणं टाळले पाहिजे. या काळात तुम्ही गडद आणि आनंदी रंग निवडू शकता. जसे की, गुलाबी, केशरी, पिवळा, गंज, जांभळा, मरून हे रंग पावसाळ्यात उठून दिसतील. तसंच तुमचा वेगळा लुक्स सुद्धा दिसून येईल.
- वेगळी स्टाईल करा : सध्या धोती साडी, रेडी टू वियरचा जमाना आहे. या जमान्यात तुम्ही, नेहमीच्या पद्धतीने साडी नेसण्यापेक्षा या नवीन ट्रेंड प्रमाणे साडी नेसावी. आजकाल बॉलिवूड सिलेब्रिटी जेगिंग्ज किंवा जीन्ससह साडी नेसतात. तर तुम्ही देखील अशावेळी स्टायलिश दिसण्यासाठी या पद्धतीचे ट्रेंड प्रमाणे साडी नेसू शकता आणि तुमच्या साडीला अशा प्रकारे स्टाइलही करू शकता.
- प्रिंट्सची योग्य निवड करा : या ऋतूत फ्लॉवर डिझाइन्स छान दिसतात. तुम्ही या प्रकारचे डिझाईन कॅरी करू शकता. जर तुम्ही पावसाळ्यात एखादी साडी खरेदी करायचा विचार करत असाल, तर फ्लॉवर डिझाइन्सच्या साड्या खरेदी करण्यात विशेष भर द्या. असले डिझाइन्स उठून देखील दिसतील आणि वेगळा लुक्स देखील तयार होईल.
- योग्य फॅब्रिक खरेदी करा : साडी खरेदी करताना फॅब्रिकच्या निवडीकडे लक्ष द्या. पावसाळ्यासाठी शिफॉन, पॉली जॉर्जेट आणि जॉर्जेट चांगले मानले जातात. ते तुमच्या त्वचेवर हलके असतात. त्यामुळे अशा सध्या या ऋतूत खरेदी करा. पावसाळ्यात कॉटनच्या साड्या घालणे टाळा. त्या पावसाळ्यात नीट दिसतही नाहीत, तसंच त्या या ऋतूत लवकर सुकतही नाहीत.

# पावसाळ्यात डेनिमने मिळवा स्मार्ट लूक

**वेगवेगळे स्टायलिश लूक करायला प्रत्येकाला आवडत. आपण प्रत्येक लूक मध्ये सुंदर दिसावं हे प्रत्येकाला वाटतं असत. कपड्यांमध्ये अनेक प्रकार आहे. मात्र, डेनिमचा ट्रेंड सध्या चांगला चाललाय. अनेकजण डेनिमप्रेमी आहेत. डेनिमची जीन्स, स्कर्ट, जॅकेट यांसारख्या गोष्टी वापरणं अनेकांना आवडतं. मात्र, तुम्ही देखील डेनिम प्रेमी असाल, त्यामध्ये देखील असलेले नवीन स्टायलिश लूक तुम्हाला माहीत असणं गरजेचं आहे. डेनिममध्ये देखील अनेक नवीन असे पॅटर्न आले आहेत की जे तुम्ही नक्की ट्राय केले पाहिजेत. चला तर मग जाणून घेऊया डेनिमचे काही स्टायलिश लूक. जे वापरून तुम्ही वेगळा लूक तयार करू शकता.**

- मस्त रंग : जर तुम्हाला काळा, निळा, पांढरा याशिवाय इतर रंग वापरायचे असतील तर तुम्हाला डेनिममध्ये अनेक रंग मिळतील. क्रिम केशरी, हिरवा, पिवळा रंग तुमची शैली आणखी वाढवेल. याशिवाय प्रिंटेड डेनिम ट्राउझर्सही तुम्हाला सहज मिळतील. या नवीन स्टाइल्स वापरून तुमचा चांगला स्टायलिश लूक बनेल.
- फ्लेर्ड डेनिम्स : सर्वच ऋतूंसाठी हे रुंद पायांचे सिल्हूट एक उत्तम पर्याय आहे. लांब हेमलाइनवर तुम्ही एखादा चांगला क्रॉप टॉप, हॉल्टर टॉप किंवा व्ही-नेक टीसह रुंद-लेग पँट घालू शकता. हा तुम्हाला दररोज पेक्षा एक चांगला लूक देईल. तसंच तुम्ही इतरांपेक्षा एक वेगळा लूक तयार करू शकता.
- डार्क वॉश : डार्क वॉश ही स्टाईल १९९० च्या दशकात खूप लोकप्रिय झाली होती. आता पुन्हा २०२२ च्या उन्हाळ्यात गडद इंडिगो डेनिम पुन्हा दिसू लागले आहे. जर तुम्ही हा पॅटर्न याआधी कधी वापरला नसेल, तर या वर्षी नक्की करून पहा. तुम्हाला यामध्ये एक चांगला लूक मिळेल. तसंच तुम्ही या डार्क वॉश मध्ये खूप उठून दिसाल.
- डेनिम मॅक्सी स्कर्ट : डेनिम मॅक्सी स्कर्ट हा तुम्हाला वेगळा लुक देण्यासाठी पुरेसा आहे. हा स्कर्ट स्नीकर्ससोबत घालता येतो, पण जर तुमची उंची चांगली असेल तर ती फ्लॅट फूटवेअरसोबतही घालता येते. दररोजच्या लुक्समध्ये जर तुम्ही कंटाळलात असाल, तर हा डेनिमचा नवीन स्टायलिश लूक तुम्हाला एक हटके लूक देईल.
- डेनिम जॅकेट : कोणत्याही साध्या ड्रेसला स्टायलिश बनवण्यासाठी डेनिम जॅकेटही पुरेसे आहे. डेनिम जॅकेटसह तुम्ही मॅक्सी ड्रेस किंवा टॉप स्टाइल करू शकता. पावसाळ्याच्या दिवसात किंवा हलक्या हिवाळ्यातही ही शैली खूपच आरामदायक दिसते. डेनिम जॅकेट तुम्ही एखाद्या जीन्सवर देखील घालू शकता. यामुळे देखील तुम्हाला एक चांगला लूक मिळेल.

# पावसाळी फॅशनची तारांबळ!



**फॅशन मेरे बस की बात नहीं, मी काय फॅशन करत नाही असं कितीही म्हटलं तरी प्रत्येक जण फॅशन करतच असतो. रोज बाहेर पडताना तुम्ही आज कोणते कपडे घालावे, या शर्टवर ही पॅण्ट छान दिसेल का किंवा यात मी जाड तर दिसत नाहीये ना असा विचार तर नक्कीच करता. म्हणजेच काय तर तुम्ही फॅशन करता, फॅशनचा विचार करता. प्रत्येक ऋतूनुसार आपली फॅशन बदलत असते किंवा ती बदलावीच लागते. अगदी ट्रेण्डिंग कपडे वगैरे तुम्ही घालत नसाल तरी कोणत्या ऋतूमध्ये कोणते कपडे घालावेत याचा विचार करावा लागतो. उन्हाळ्यात आणि हिवाळ्यात आपण जेवढा कपड्यांचा, फॅशनचा विचार करत नाही तेवढा जास्त पावसाळ्यात करावा लागतो. कारण तो विचार जर नाही केला तर आपली फॅशनेबल तारांबळ नक्कीच उडते...**

पाऊस आणि फॅशन हे समीकरण जुळवून आणणं फार महत्त्वाचं असतं. कारण पावसाळ्यात आपण जरा जरी चुकलो की झालंच.. आपल्या फॅशनचे तीनतेरा वाजतात. आपण पाऊस आणि फॅशन या समीकरणाची सुरुवात खरेदीपासून करू. आधी म्हटल्याप्रमाणे ऋतू बदलतात तशी फॅशन बदलते. साहजिकच हा बदल बाजारातही दिसून येतो. नवीन ऋतू, नवीन कलेक्शन. पण जसा एखादा ऋतू संपून पुढच्या ऋतूची चाहूल लागते तसे वेगवेगळे सेलही सुरू होतात. या सेलमधला एक प्रकार म्हणजे 'स्टॉक क्लिअरन्स सेल'. लास्ट कलेक्शनमध्ये उरलेले कपडे त्यांना विकायचे असतात, कारण बाजारात नवीन कलेक्शन आणायचं असतं. अशावेळी आपण भरघोस सवलत आहे म्हणून भरपूर खरेदी करतो. पण आपण हे विसरतो की त्या सेलमध्ये असणारे कपडे किंवा ॲक्सेसरीज या आताच्या ऋतूमधे वापरताच येणार नसतात. अनेकदा सेलमध्ये घेतलेल्या गोष्टी या पुढच्यावेळी ट्रेण्डमध्ये असतीलच याची खात्रीही नसते. त्यामुळे पाऊस आणि या सेलमधील खरेदी थोडी विचारपूर्वकच करा. पावसाळी खरेदी म्हणजे स्वतचा पावसापासून बचाव करण्यासाठी लागणाऱ्या गोष्टी असा समज असतो. पण ही पावसाळी खरेदी फक्त तेवढ्यापुरतीच नसते. आपल्याला आपल्या रोजच्या कपडय़ांचीही खरेदी विचारपूर्वक करायला हवी. उन्हाळ्यात जसे आपण कॉटनचे कपडे घालतो तसे पावसाळ्यातही कॉटनचे कपडे घालायला काहीच हरकत नाही. कारण कॉटनचे कपडे लवकर सुकतात. पण १०० टक्के कॉटनचे कपडे मात्र चुकूनही घेऊ नका. कॉटन आणि दुसरं कापड एकत्र असणारे कपडे घ्या. कारण कॉटन पटकन सुकत असलं तरी त्यानंतर मात्र त्याचा वास येतो आणि ते अंगातून पटकन निघतही नाही. त्यामध्ये दुसरं कापड ब्लेण्ड केलेलं असेल तर तसा कमी वास येतो आणि अंगातून पटकन निघतं. या सोबतच आपण पावसाळ्यात चुकून जरी पारदर्शक कपडे वापरले तर भलतीच तारांबळ उडते. कारण अशा कपड्यांमधून आपलं अंतर्वस्त्र, अंग दिसतं आणि हे असं दिसणं आपल्याला कोणत्याही ठिकाणी लाज आणतं. त्यामुळे पावसाळ्यासाठी खरेदी करताना गडद रंगाचे आणि पारदर्शक नसलेले कपडे विकत घ्या. पावसाळ्यात पॉलिस्टर, नायलॉनचे कपडे घालावेत असं सांगितलं जाई. पण हेच कपडे जास्त पारदर्शक असतात, त्यामुळे तसे कपडे घेताना नीट लक्ष द्या. पावसाळा आला की नवनवीन, रंगीबेरंगी, फॅशनेबल रेनकोट, चप्पल, छत्र्या बाजारात येतात. पण प्रत्येक छत्री, रेनकोट हे फॅशनसोबतच आपली गरजही पूर्ण करेल असं होत नाही. उंचीला मोठय़ा असणाऱ्या, रंगीबेरंगी, सुंदर पिंट्र असणाऱ्या छत्र्या मुली खरेदी करतात. त्या उंच दिसत असल्या तरी त्या उघडल्यावर मोठ्या नसतात. छत्रीप्रमाणे रेनकोट घेतानाही आपण काही चुका करतो. रंग, डिझाइन आणि फिटिंग छान आहे म्हणून आपण रेनकोट लगेच



विकत घेतो. पण रेनकोट घेताना या सगळ्या गोष्टीसोबत रेनकोटचं कापड बरोबर आहे ना, त्यावरून पाणी ओघळून जाईल ना, त्याच्या सगळ्या चेनची नीट उघडझाप होत आहेत ना, या सगळ्या गोष्टी बघणं गरजेचं असतं. रेनकोट शक्यतो दुकानातूनच खरेदी करा. त्याची खरेदी रस्त्यावर नकोच. पावसाळ्यात चपलांची ग्रीप नीट असणं अति महत्त्वाचं असतं नाही तर आहेच भर रस्त्यात आपला कपाळमोक्ष. कापडाचे बूट तर सुकता सुकत नाहीत आणि त्यांची दुर्गंधी तर वेगळीच. पावसाळ्यात चामड्याचे बूट किंवा चप्पल वापरली तर ती आपल्याला परत वापरण्यायोग्य राहत नाही. त्यामुळे पावसाळ्यात बाजारात आलेले प्लास्टिकचे शूज, चप्पलच वापरा. पावसाळी फुटवेअरची खरेदी दुकानातूनच करावी असं काहीही नाही. रस्त्यावर घेतलेले फुटवेअरही छान टिकतात. पावसाळ्यात घालायच्या दागिन्यांची निवडही नीट करावी. नाही तर दागिन्यांचा रंग जाणं, ते दागिने अंगाला लागून त्वचेला त्रास होणं असे प्रकार होतात. त्यामुळे पावसाळ्यात कमीत कमी दागिने घाला. वॉटरप्रूफ, चांगला दर्जा असलेले दागिने घाला. सध्या चंकी दागिने जास्त ट्रेण्डिंग आहेत आणि ते पाण्याने खराबही होत नाहीत.

# मान्सूनमध्ये भारी लूक देणाऱ्या लिप्स शेड्स!

**पावसाळ्यात आर्द्रता जास्त असल्याने खूप घाम येतो. अशा परिस्थितीत जास्त मेकअप केल्यास सुंदर दिसण्याऐवजी तुमचा लूक खराब करू शकतो. पावसाळ्यात हलका मेकअप करणे जास्त चांगले आहे आणि काही विशेष प्रकारच्या लिपस्टीक तुमच्या मेकअप किटमध्ये ठेवू शकता. आज आम्ही तुम्हाला अशा लिप्स शेड्स बाबत सांगणार आहोत ज्या वापरून तुम्ही पावसाळ्यातही तुमचा लूक चांगला दिसेल...**




- बेरी टोन : पावसाळ्यात बेरीच्या वेगवेगळ्या शेड्स जसे की डीप रेड, प्लम किंवा क्रॅनबेरी असे रंग निवडा. हे शेड्स जवळजवळ प्रत्येक त्वचेच्या टोनला सूट देतात आणि तुमचा लूक सुधारण्यासाठी मदत करतात.
- रोज पिंक : सॉफ्ट रोज पिंक शेड्स तुम्हाला सुंदर दिसण्यासोबतच तरुण दिसण्यासाठी देखील मदत करतात. ते ओठांना नॅचरल लूक देतात, सर्वात चांगली गोष्ट म्हणजे तुम्ही त्यांना कॅज्युअल आणि फॉर्मल लूकमध्ये वापरू शकता.
- कोरल शेड : चमकदार कोरल शेड्स पावसाळ्याच्या दिवसामध्ये हटके लूक देण्यासाठी मदत करतात. या रंगामुळे तुम्ही तुमच्या वास्तविक वयापेक्षा तरुण दिसता आणि तुमचे सौंदर्य वाढवता.
- न्यूड शेड्स : जर तुम्हाला गडद लिपस्टिक वापरणे आवडत नसेल तर तुम्ही न्यूड शेड्स निवडू शकता. न्यूड शेड्सही प्रत्येक आउटफिटसोबत वापरता येतात.
- मोव्ह शेड : गुलाबी आणि जांभळ्या रंगाची शेड असलेली लिपस्टिक ही एक दिवसभरच्या लूकसाठी योग्य पर्याय आहे. बरं, तुम्ही रात्रीच्या पार्टीसाठी किंवा लग्नासाठी या शेड्स वापरून पाहू शकता.

# टीप्स मान्सून मेकअपच्या...

**मेक-अप करताना काय काळजी घ्यायची, सौंदर्यप्रसाधनं कोणती वापरायची, मेक-अप बेस कसा असावा, आधी काय लावायचं, कसं लावायचं अशा अनेक शंका मनात असतात. त्यांचं समाधान करणारा लेख...**

- स्वच्छ आणि निरोगी त्वचा : दमट वातावरणामुळे त्वचेवर मुरूम येण्याचा अधिक संभव असतो. त्यासाठी दिवसातून तीन-चार वेळा चेहरा थंड पाण्याने धुऊन वॉटर बेस्ड मॉइश्चराइजर लावा. जेणेकरून घाम येण्याचे प्रमाण कमी होईल. हेच प्रमाण अजून कमी करण्यासाठी बर्फाने चेहऱ्याला ५ ते १० मिनिटे मसाज करा. यामुळे त्वचा तजेलदारही होईल तसेच मेकअप जास्त काळ



टिकून राहील.
- फाउंडेशन : पावसाळ्यात फाउंडेशन टाळलेलेच बरे. पाण्याने किंवा घामाने चेहरा ओला झाल्यास चेहऱ्यावर पॅचेस येतात. म्हणून मेकअप बेस तयर करण्याकरिता लूज पावडरच वापरा.
- ब्लशर : कोऱ्या चेहऱ्याला ब्लशरने नक्कीच गेटअप येईल. ब्लशरची शेड निवडताना तुमच्या चेहऱ्याला व्यवस्थित ब्लेंड होईल असाच निवडा. क्रिमी किंवा स्पार्कल असलेले ब्लशर वापरू नका.
- लिपस्टिक : पावसाळ्यात ओठांचा मेकअप थोडासा डल पण मोहक वाटणारा असावा. भडकपणा येणार नाही याची काळजी घ्या. त्यासाठी पारदर्शक लिप ग्लॉस वापरा. लूक टिकवून ठेवण्यासाठी तो दिवसातून अनेक वेळा लावला तरी चालेल. ग्लॉसी लिपस्टिकपेक्षा मॅटला प्राधान्य द्या. पिक आणि ब्राउनच्या विविध शेड्सची निवड करू शकता. तुम्ही लिप लायनरचाही वापर करू शकता. फक्त ते वॉटरप्रूफ आहे याची खात्री करून घ्या. नाहीतर पावसाचे थेंब पडताच ते पुसले जाईल.
- भुवया : भुवया नेहमी व्यवस्थित कोरलेल्या असू द्याव्यात. तसेच त्या क्लियर किंवा टिन्टेड जेलनी सेट कराव्यात. आय ब्रो पेन्सिलचा वापर करू नये.

## डोळ्यांचा मेकअप

पावसाळ्यात डोळ्यांचा मेकअप करत असताना विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. कारण खूप वेळ खर्च करून तुम्ही आयशॅाडो, मस्कारा, लाइनर लावत असतात आणि पावसाचे काही थेंब पडताच पूर्ण मेक अप खराब होतो. मेकअप खराब होण्याचे आणखी एक कारण म्हणजे दमट हवा. आय लाइनरपेक्षा कोहल वापरा. कारण तुलनेने कोहलची पाण्याला प्रतिकार करण्याची क्षमता जास्त काळ असते. पावडर आय शॅडोमध्ये टरक्वाइस, ब्राउन, ब्ल्यू, ग्रीन आणी पिक शेड्सची निवड करा. वॉटरप्रूफ मस्काऱ्याचे एक किंवा दोन कोट्स द्या.

## हे लक्षात घ्या...

चेहऱ्यावर फाउंडेशन वापरणे शक्यतो टाळावे. त्याऐवजी तुम्ही कोणतीही फेस पावडर वापरू शकता. फेस पावडर वापरताना, त्याचे प्रमाण आवश्यक तेवढेच ठेवावे याची विशेष काळजी घ्यावी लागेल. ब्लशिंगसाठी, पावडरऐवजी क्रीम ब्लशर वापरणे चांगले. त्याचा वापरही जपून करावा. याशिवाय जेव्हाही तुम्ही पावसात भिजता तेव्हा पूर्ण चेहरा रुमालाने जोरात पुसण्याऐवजी हलकेच पुसावा. आयशॅडोसाठी हलके रंग वापरणे चांगले. यासाठी पावडरऐवजी क्रीम वापरा जेणेकरून ओले झाल्यावर ते पसरून चेहऱ्यावर येणार नाही. पावसाळ्यात मेकअप करताना मस्करा टाळावा. याशिवाय पेन्सिल लाइनर आणि त्यानंतर लिक्विड आयलायनर डोळ्यांच्या मेकअपसाठी अधिक योग्य आहे. यामुळे तुम्ही पावसात भिजलात तरी ते तुमच्या चेहऱ्यावर पसरण्याचा धोका नाही.



## या गोष्टी टाळाव्यात...

- क्रीम बेस्ड कॉस्मेटिक्स : उदाहरणार्थ फाउंडेशन, प्रायमर किंवा आयशॅाडो. क्रीम बेस्ड कॉस्मेटिक्सने जास्त घाम येतो त्यामुळे मेकअप वितळण्याची शक्यता असते.
- ग्लॉस आणि स्पार्कल्स : जास्तीच्या ग्लॉस आणि स्पार्कल्सच्या वापराने मेकअपचा अतिरेक केला आहे असे वाटते.
- लिप ग्लॉस : लिपस्टिकवरती डिप लिप ग्लॉस लावल्यास ओठ जास्त चिकट होतील तसेच तुम्हाला अस्वस्थही वाटेल.

## शॉर्ट न्यूज

### घर फोडून १० तोळे दागिन्यांची चोरी

**अहिल्यानगर :** शहरातील सारसनगर परिसरात एका बंद घराचे कुलूप तोडून तीन अज्ञात चोरट्यांनी सुमारे १० तोळे वजनाचे सोन्याचे दागिने व ८ हजार रुपयांची रोकड असा ऐवज चोरुन पोबारा केल्याची घटना घडली. या प्रकरणी केवलकुमार भगवानदास गांधी (वय ५७, रा. सारसनगर, अ. नगर) यांनी भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे घराला कुलूप लावून कुटुंबासह बाहेर गेले होते. ती संधी साधून त्यांच्या बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात तीन आरोपींनी त्यांच्या घरातील बेडरुम मधील कपाटाचे लॉक चोरी केली आहे.

### नेवासेत विठ्ठलनामाने ज्ञानमंदिरे दुमदुमली

**नेवासा :** आषाढी एकादशीनिमित्त नेवासा तालुक्यातील अनेक जिल्हा परिषद व इंग्रजी माध्यमातील शाळेच्या बालवारकऱ्यांनी पालखी व दिंड्या काढल्या. दरम्यान, या चिमुरड्या बालवारकऱ्यांना दिंड्यांदरम्यान केलेल्या ''ज्ञानोबा. माऊली. तुकाराम'' व विठ्ठलनामांच्या जयघोषांनी तालुक्यातील बहुतांशी ज्ञानमंदिरांसह गावे दुमदुमली होती. आषाढी एकादशी रविवारी आल्याने नेवासा तालुक्यांतील जिल्हा परिषद व इंग्रजी माध्यम शाळांनी दिंड्या व पालख्यांचे नियोजन केले होते.

### श्रीगोंद्यात गुटखा विक्रेत्यांवर कारवाई

**श्रीगोंदा :** प्रशिक्षणार्थी पोलीस उपअधीक्षक संतोष खाडे यांच्या पथकाने श्रीगोंदा शहरात भल्या पहाटे राज्यात बंदी असलेला गुटखा, सुगंधी सुपारी आणि चारचाकी वाहन असा ११ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याबाबत अन्न सुरक्षा अधिकारी राजेश बढे यांच्या फिर्यादीवरून दोन जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी घोडेगाव रोड इनामदार वस्तीजवळ एक टेम्पो ताब्यात घेतला. टेम्पोत गुटखा तसेच सुगंधी सुपारी अंदाजे किंमत ३ लाख ९२ हजार रुपयाचा मुद्देमाल आढळून आला. पोलिसांनी टेम्पोसह ११ लाखांचा मुद्देमाल जप्त केला.

### ठाकरे बंधूच्या एकोप्याचा जल्लोष

**पाथर्डी :** सरकारने महाराष्ट्रातील हिंदी सक्ती मागे घेतल्यानंतर आयोजित विजयी मेळाव्यानिमित्त तब्बल २० वर्षांनंतर मनसे प्रमुख राज ठाकरे आणि शिवसेनाप्रमुख उद्धव ठाकरे एकत्र, एकाच व्यासपीठावर आले. यानिमित्त पाथर्डी शहरातील स्व. वसंतराव नाईक चौकात शिवसेना (उबाठा) पक्षाच्यावतीने फटाके फोडून घोषणा देत जल्लोष करण्यात आला. शिवसेना तालुकाप्रमुख भगवान दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली नवनाथ चव्हाण, रामकिसन भिसे, नंदकुमार डाळिंबकर, सचिन नागपुरे आदी शिवसैनिकांनी फटाके फोडून आणि मराठी घोषणांनी परिसर दणाणून टाकत आनंदोत्सव साजरा केला.

### खंडित विजेमुळे नागरिक वैतागले

**केडगाव :** येथील प्रभाग क्र. १६ अंतर्गत येणाऱ्या रभाजीनगर, वैष्णवनगर, भूषणनगर आणि आजूबाजूच्या परिसरात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्यामुळे स्थानिक नागरिक हैराण झाले आहेत. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी अधिक क्षमतेची नवीन डीपी उभारण्याची मागणी नागरिकांच्या वतीने आमदार संग्राम जगताप यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. संभाजीनगर येथील जुन्या डीपीद्वारे वैष्णवनगर, भूषणनगर आदी भागांना वीजपुरवठा करण्यात येतो. परंतु गेल्या काही वर्षांत या भागात लोकसंख्या आणि घरांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

# भारताचा 'शुभ'आरंभ!

### इंग्लंडचे गर्वहरण करत दणदणीत विजय । ब्रिटीशांच्या मैदानात तिरंगा फडकला



**बर्मिंगहम: वृत्तसंस्था**

**इंग्लंडचे गर्वहरण करत भारतीय संघाने ब्रिटीशांच्या मैदानात तिरंगा फडकवला. दुसऱ्या कसोटी सामन्यात भारताने देदिप्यमान कामगिरीचा नजराणा पेश केला. शुभमन गिलने द्विशतकासह भारताच्या विजयचा पाया रचला होता. भारताच्या गोलंदाजांनी त्यावर कळस चढवला आणि त्यामुळे भारताला हा दुसरा सामना जिंकता आला. भारताने या सामन्यात ३३७ धावा राखत मोठा विजय मिळवला. या सामन्यातील विजयासह भारताने मालिकेत १-१ अशी बरोबरी केली आहे. पहिला कसोटी सामना भारताला गमवावा लागला होता. त्यानंतर या सामन्यातील विजयासह युवा भारताने या मालिकेत आता १-१ अशी बरोबरी केली आहे.**

शुभमन गिलने पहिल्या डावात द्विशतकत झळकावले, तर दुसऱ्या डावात त्याने शतकही पूर्ण केले. त्यामुळे गिलच्या या धडाकेबाज फलंदाजीच्या जोरावर भारताने इंग्लंडपुढे विजयासाठी ६०८ धावांचे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना भारताने इंग्लंडची चौथ्या दिवशी ३ बाद ७८ अशी अवस्था केली होती. त्यानंतर पाचव्या दिवशी भारताला विजयासाठी सात विकेट्सची गरज होती. पण पाचव्या दिवसाच्या सुरुवातीला जोरदार पाऊस आला आणि सामना वेळेत सुरु झाला नाही. पण पावसानंतर भारतीय गोलंदाजांच्या अचूक गोलंदाजीने इंग्लंडच्या फलंदाजांच्या नाकी नऊ आणले होते. खासकरुन आकाश दीप त्यावेळी आग ओकत होता. आकाश दीपने एकामागून एक दोन धक्के इंग्लंडला दिले.

आकाश दीपने प्रथम ऑली पोपला २४ धावांवर असताना क्लीन बोल्ड केलं. त्यानंतर आकाश दीपने अप्रतिम चेंडू टाकत भारताच्या विजयाच्या मार्गात अडसर ठरत असलेल्या हॅरी ब्रुक्सला बाद केलं. यावेळी आकाशने एवढा वेगवान चेंडू टाकला की, आपण बाद झालो, हे हॅरीला समजलंच नाही. त्यांनतर बेन स्टोक्सचा अडसर वॉशिंग्टन सुंदरने दूर केला. पण यावेळी जेमी स्मिथ भारताच्या विजयाच्या मार्गातील मोठा काटा होता. पण आकाश दीपने त्याला ८८ धावांवर बाद केले आणि तिथेच भारतीय संघाचा विजय निश्चित झाला. भारताने या सामन्यात अचूक गोलंदाजी केली आणि त्याचा फायदा त्यांना झाल्याचे पाहायला मिळाले.

## तृप्ती देसाईवर कारवाईची मागणी ; पोलीस अधीक्षकांना निवेदन

**नगर : प्रतिनिधी**

**भाजप जिल्हा अध्यक्ष नितीन दिनकर यांच्यावर तृप्ती देसाई यांनी खोटे आरोप केलेले आहेत. त्याची चौकशी करून देसाई यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी सकल मातंग समाजाच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत पोलीस अधीक्षक यांना निवेदन देण्यात आले आहे.**




यावेळी सकल मातंग समाजाचे अंकुश मोहिते, नामदेवराव चांदणे, पोपटराव पाथरे, पप्पू पाटील, शाहूराजे वडागळे, बाबू पाचारणे, प्रकाश वाघमारे, संतोष शिरसाठ, भगवान मिसाळ, रणजीत वैरागर, दीपक सरोदे, सागर घोरपडे, दीपक साबळे, सुभाष वाघमारे, प्रवीण कांबळे आदी उपस्थित होते.

खोटे षडयंत्र करून नितीन दिनकर यांना बदनाम करण्याचे प्रयत्न काही लोक करत आहेत. जिल्हा अध्यक्ष झाल्यापासून ते पक्ष बळकट करण्याचे काम करून गोरगरिबांचे कामे करून न्याय मिळवून देत आहेत.मागासवर्गीय व्यक्ती एवढा मोठ्या पदावर असल्याने काही समाजकंटकांना हे देखवत नाही, असे ही त्यांनी म्हटले आहे. त्यामुळे तृप्ती देसाई यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी त्यांनी केली आहे.

## वाचकांच्या लेखणीतून

### समर्थांची शब्दकळा



संत आनंदाचे स्थळ।
संत सुखचि केवळ।
नाना संतोषाचे मूळ।
ते हे संत।।

संत आनंदाचे ठिकाण आहे. केवळ सुख. विविध सुखांचा स्त्रोत. ते हे संत होत. स्वामी समर्थ रामदास हे १७ व्या शतकात महाराष्ट्रात होऊन गेलेले महान संत. प्रपंचातून परमार्थ साधण्यासाठी त्यांनी दासबोध ग्रंथ लिहिला. मनाचे श्लोक, जनस्वभाव गोसावी, आनंदवनभुवनी, करुणाष्टके अशा स्फुट काव्य रचनाही केल्या. त्यांच्या काही हिंदी पद्यरचनाही सापडतात.

वेडे आलेसे पाहुणे।
तेचि जगासी मेहुणे।।
पाहुणा जाईना जाईन।
थोडेही खाईना।।

समर्थांच्या स्फुट रचनांतून अशी सहजसोपी शब्दकळा आढळते. संत ज्ञानेश्वरांसारखीच शब्दकळा, शब्दसौष्ठव आणि भाषाशैली समर्थ लीलया आळवूवळवू शकत. असा एक अभिप्राय मी नागपूर तरुण भारत दैनिकात लिहिला होता.

कवित्व शब्दसुमन माळा।
अर्थपरिमळ आगळा।
तेणे संतषट्पदकुळा
आनंद होये।।

कवित्व म्हणजे शब्दफुलांच्या माळाच जणू. पण त्यातून निघणारा अर्थसुगंध काही वेगळाच! त्यामुळे भृंगरूपी संतकुळाला आनंद होतो. असे समर्थ म्हणतात. नामोल्लेख केला नसता तर ही पद्यरचना संत ज्ञानेश्वरांचीच आहे अशीच बहुतेकांची धारणा झाली असती. । समर्थांची ही काव्यरचना संत ज्ञानेश्वरांच्या शब्दकळेची आठवण करून देणारी आहे. मूळ ज्ञानेश्वरीतून किंवा कथाकीर्तनांतून आपण माऊलींच्या भाषाकळेशी परिचित असतोच. त्यामुळे ज्ञानेश्वरीतून एखादे उदाहरण देण्याची आवश्यकता वाटत नाही. पण येथे अर्थपरिमळ असलेली समर्थ शब्दकळा वाखाणण्याजोगी आहे एवढे मात्र खरे.

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,
जि. अहमदनगर.

## साडेपाच हजार बाल वारकऱ्यांमुळे पाथर्डीला पंढरीचे रूप

### बारा शाळांचा दिंडी सोहळ्यात सहभाग । पालकांकडून स्वागत

**पाथर्डी : प्रतिनिधी**



**आषाढी एकादशीच्या पूर्वसंध्येला शहरातील सर्व शाळांमधील सुमारे साडेपाच हजार विद्यार्थ्यांनी शहरात काढलेल्या दिंड्या, पालख्यांची सांप्रदायिक पद्धतीने काढलेली दिंडी, यामुळे शहराला पंढरीचे रूप येऊन वातावरण चैतन्याने भरून गेले. शाळांचा मार्ग मिरवणुकीसाठी बहुतेकांनी एकच निवडल्याने मध्यवर्ती चौक पंढरपूर भासत होता. बालवाडीपासून बारावीपर्यंतच्या एकूण बारा शाळांनी संपूर्ण संप्रदाय आज सजीव केला. रस्त्याच्या दुतर्फा नागरिकांनी गर्दी करीत विविध पालख्यांवर फुलांची उधळण केली.**

शहरातील स्वामी समर्थ विद्यालय, विवेकानंद विद्यालय, ज्ञानेश्वर विद्यालय, एम.एम. निऱ्हाळी विद्यालय, आदर्श माध्यमिक विद्यालय, सावित्रीबाई कन्या विद्यालय, श्री तिलोक जैन इंग्लिश मीडियम स्कूल, श्रीश्री रविशंकर विद्यालय, गुरुकुल इंग्लिश मीडियम स्कूल, बीडीएस इंग्लिश मीडियम स्कूल, यशवंत पब्लिक स्कूल, जिल्हा परिषद शाळा, जिल्हा परिषद मुलींची शाळा यांसह अन्य शाळांनी विद्यार्थ्यांकडून अत्यंत परिश्रमपूर्वक तयारी करून घेत केलेले सादरीकरण कौतुकाचा विषय ठरले. टाळ पखवाज वाजवणारे विद्यार्थी, पावली, फुगड्या खेळत, धावत धावत ध्वज फडकावत पांडुरंगाचा धावा करणारे पथक पाहून सर्व जण चकित झाले. सुमारे पाचशे शिक्षक व प्रशिक्षकांनी १५ दिवस विद्यार्थ्यांना यासाठी प्रशिक्षण दिले. विशेष म्हणजे मुलांचे पाठांतर व एकाग्रचिताने सादर केले जाणारे पथक लक्षवेधी ठरले. विविध चौकात व रस्त्यावर लोकांनी पुष्पवृष्टी करून स्वागत केले. स्वामी समर्थ विद्यालयाचे रस्त्यावरील प्रसाद वाटपाचा कचरा गोळा करणारे स्वतंत्र पथक होते. विविध दिंड्यांनी पाणीबचत, पर्यावरण रक्षण, ग्रामस्वच्छता, पशुपक्ष्यांप्रती विशेष संदेश देणारे फलकही हातामध्ये घेतले होते. विविध संत व देवतांच्या वेशभूषा केलेले विद्यार्थी कलाकारांमध्ये विशेषतः विठ्ठल-रुक्मिणीची वेशभूषा, तर बहुतेक शाळांमधून उत्तम रितीने सादर झाली. सर्व विद्यार्थी सुमारे पाच तास मिरवणुकीमध्ये उत्साहाने चालत राहिले.

(पान १ वरून)

### टाकळी हाजीत सैराट!

धमक्या देखील दिल्या होत्या. या संदर्भात दत्तात्रय याने पोलिसात तक्रार देखील दाखल केली होती.आत दत्तात्रय वाघ हा त्याच्या सलूनमध्ये शटर बंद करून, आशुतोष भाकरे याचे केस कापत असताना, अचानक दुकानाचे शटर उघडून जीवन रविंद्र गायकवाड, शारुख बाबू शेख (वय २६), प्रशांत हनुमंत साठे (वय १९) हे तिघे दुकानामध्ये घुसले. त्यांनी दत्तात्रय याच्या दुकानाच्या काचा फोडल्या. त्याचप्रमाणे दुकानातील साहित्याची नासधूस केली. जीवन गायकवाडने लोखंडी कोयत्याने दत्तात्रय वाघ याच्या डाव्या मनगटावर आणि पाठीवर गंभीर वार करून, तिघा आरोपींनी दत्तात्रयला जीवे मारण्याची धमकी देऊन तीनही आरोपी मोटारसायकल वरून रांजणगावच्या दिशेने निघाले.हे आरोपी पळून जात असताना गावकऱ्यांनी पाठलाग करून दोघा अनोळखी आरोपींना पकडून टाकळी हाजी पोलीस चौकीमध्ये आणले. पोलिसांनी चौकशी केली असता, त्यांची नावे शारुख शेख आणि प्रशांत साठे अशी असल्याचे निष्पन्न झाले. तसेच जीवन गायकवाडच्या मदतीने दत्तात्रय वाघ याच्यावर हल्ला केल्याचेही आरोपींनी पोलिसांना सांगितले. या हल्ल्यात गंभीर जखमी झाल्यामुळे दत्तात्रय वाघ याला शिरूर ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून, त्यांच्या तक्रारीवरून तिघा आरोपींविरोधात गंभीर दुखापत, तोडफोड व जीव घेण्याचा प्रयत्न या कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी दत्तात्रय हौशीराम वाघ त्याने फिर्याद दिली आहे. याप्रकरणी जीवन रविंद्र गायकवाड (रा.कानगाव, ता.दौंड,जि.पुणे याच्यासह शारुख बाबू शेख (वय २६ वर्ष) आणि प्रशांत हनुमंत साठे (वय १९ वर्ष,दोघेही रा. पाटस, ता.दौंड, जि.पुणे) या तीन आरोपींच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासह तिन्ही आरोपींच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### पांडुरंगाचं दर्शन घेऊन निघाले, वाटेत काळ आडवा आला

भरधाव टँकरने पाठीमागील बाजूने जोरदार धडक दिल्याने पतीचा जागीच मृत्यू झाला. तर पत्नीचा खासगी दवाखान्यात उपचारादरम्यान मृत्यू झाला. सदरचा अपघात रविवारी ( ६ जुलै) सकाळी १० वाजण्याच्या सुमारास पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर भिगवण ग्रामपंचायत कार्यालयाजवळ घडल्याची माहिती आहे.

मल्हारी बाजीराव पवार (वय ५७), पंखाबाई मल्हारी पवार (वय ५० रा. येळपणे, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर) हे दाम्पत्य आषाढी एकादशीच्या निमित्ताने पांडुरंगाच्या दर्शनासाठी पंढरपूरला गेले होते. पंढरपूरवरून परतत असताना पुणे जिल्ह्यातील भिगवण जवळ त्यांच्या दुचाकीला एका टँकरने जोरदार धडक दिली. ही धडक इतकी जोरदार होती की यात पती मल्हारी बाजीराव पवार यांचा जागीच मृत्यू झाला. तर, पंखाबाई मल्हारी पवार यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या दुर्घटनेमुळे येळपणे गावावर शोककळा पसरली आहे.

आषाढी एकादशी असल्याने विठ्ठलाचे दर्शन घेऊन पवार पती-पत्नी हे पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरून सोलापूरकडून पुण्याच्या दिशेने दुचाकीने क्रमांक (एमएच १६ एजी २३४३) चालले होते. सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास ते भिगवण येथील रवींद्र सेल्स या दुकानासमोर पोहचले. इथेच त्यांच्या गाडीला एका टँकरने जोरदार धडक दिली. यामध्ये पवार हे जागीच ठार झाले, तर पंखाबाई यांचा रुग्णालयात मृत्यू झाला. अपघातानंतर टँकरचालक पळून गेला असून भिगवण पोलीस त्याचा तपास करीत असल्याची माहिती आहे. पवार दाम्पत्यावर येळपणे येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. पवार यांच्या मागे एक मुलगा, दोन मुली असा परिवार आहे.

### बळीराजाचा आक्रोश विधानसभेत गगनभेदी !

ते खडकी, खंडाळा परिसरात अतिवृष्टीमुळे शेती, पिके, रस्ते आणि जलसंत्तीचे मोठे नुकसान झाल्याकडे आ. दाते यांनी लक्ष वेधले. हमीभाव आणि बाजार समित्यांमधील अनियमितता उजेडात

कांद्याच्या विक्री प्रक्रियेत व्यापाऱ्यांची मक्तेदारी आहे. नाशिक बाजार समितीप्रमाणे राज्यातील इतर बाजार समित्यांमध्येही लिलाव प्रक्रिया पारदर्शक आणि कर्मचारी नियंत्रित व्हावी जेणेकरून शेतकऱ्यांना न्याय मिळू शकेल असा विश्वास आ. दाते यांनी व्यक्त केला.

### ठेकेदाराच्या गलथानपणामुळे ३०० कोटींची योजना ठप्प

**आ.डी.एस.एस. या योजनेअंतर्गत नगर जिल्ह्यात सुरू असलेली योजना परराज्यातील ठेकेदारांच्या हलगजपणामुळे संपूर्णपणे ठप्प झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीसाठीच्या वीज पुरवठयामध्ये अडथळे येत असल्याचेही दाते यांनी सभागृहापुढे मांडले.**

### महात्मा गांधींच्या पुतळ्याची विटंबना

ठिकाणांची सुरक्षा व्यवस्था आणि पर्यवेक्षण पद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत. विशेषतः महात्मा गांधी यांच्यासारख्या राष्ट्रपुरुषाच्या पुतळ्यावर सार्वजनिक ठिकाणी हल्ला होणे ही अतिशय गंभीर बाब मानली जात आहे.

पोलिसांकडून आरोपीच्या मानसिक स्थितीची तपासणी केली जात आहे. हे कृत्य नियोजित होते की मानसिक असंतुलनातून घडले, याचाही शोध घेतला जात आहे. आरोपीविरुद्ध कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू झाली असून, लवकरच त्याला न्यायालयात हजर करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे.

या घटनेने सामान्य नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात असून, शहरातील प्रमुख सार्वजनिक स्थळांवर सुरक्षा वाढविण्याची मागणी जोर धरू लागली आहे.



# पळशी तीर्थक्षेत्राच्या विकासाचा ध्यास

## सुजित झावरे पाटील यांचे प्रतिपादन | आषाढी एकादशीनिमित्त महापूजा

पळशी : प्रतिनिधी

**प्रति पंढरपूर म्हणून ओळख असलेल्या पळशी या पवित्र तीर्थक्षेत्राचा सर्वांगीण विकास हेच आमचे सर्वोच्च ध्येय असून या तीर्थक्षेत्राला राज्य सरकारकडून ब वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळवून देण्यासाठी आपला पाठपुरावा सुरू असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांनी केले.**

आषाढी एकादशीच्या निमित्ताने झावरे यांच्या हस्ते पहाटे पाच वाजता महाआरती व महापूजा पार पडली. यावेळी विठूरायाच्या जयघोषाने मंदिर परिसर दुमदुमला होता. पारंपरिक वाद्यांच्या गजरात, भगव्या पताकांनी सजलेल्या दिंडयांनी संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले होते. विठ्ठल-रूख्मिणीच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांचे स्वागत देवस्थान समितीच्या वतीने भक्तिभावाने करण्यात येत होते. याप्रसंगी बा.ठ.झावरे, शंकर बर्वे, मिठू जाधव, संतोष जाधव, गणेश हाके, भाऊसाहेब सैद, दिलीप पाटोळे आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना झावरे म्हणाले, विठ्ठल भक्तांना अधिक सोयी-सुविधा मिळाव्यात यासाठी मंदिर परिसररात पाणीपुरवठा, स्वच्छतागृह, माहिती फलक, सायंकालीन प्रकाश योजना अशा आधुनिक सुविधा उभारण्याचे नियोजन सुरू असून त्या माध्यमातून पळशीचे रूपांतर देशातील एक प्रमुख तीर्थक्षेत्र म्हणून करण्याचा आपला मानस आहे.



पळशी देवस्थान येथे आषाढी एकादशी निमित्त सुजित झावरे पाटील यांच्या हस्ते महापूजा व महाआरती करण्यात आली.

### ठळक मुद्दे

महाआरती आणि महापूजेप्रसंगी भाविकांचा उत्साह
हजारो भाविकांची हजेरी आणि टाळ-मृदुंगाच्या गजरामुळे भक्तिमय वातावरण देवस्थानला ब वर्ग दर्जा मिळवून देण्यासाठी प्रयत्न मंदिर परिसरात आधुनिक सुविधा विकसित करण्याचे नियोजन पोलीस प्रशासनाचे बंदोबस्ताचे उत्कृष्ट नियोजन

### गर्दी आणि भक्तिभावाने भरलेला उत्सव

आषाढी एकादशीनिमित्त मंदिरात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. राज्याच्या विविध भागांतून आलेल्या दिंडयांचे देवस्थानच्या वतीने स्वागत करण्यात येऊन दिंडीप्रमुखाचा सन्मान करण्यात येत होता. टाळ-मृदुंगाच्या गजरात अभंग गायनाच्या सुरात पंढरीची वाट पळशीकडे वळताना दिसली.

### अध्यात्मिक प्रेरणास्थान

पळशी हे केवळ तीर्थक्षेत्र नाही, तर एक अध्यात्मिक प्रेरणास्थान आहे.या गावाचे संत परंपरेशी असलेले नाते, भाविकांचा ओघ आणि स्थानिकांचा सेवाभाव हेच या ठिकाणाचे खरे वैभव आहे. प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थांच्या संयुक्त सहभागातून पळशी लवकरच देशपातळीवर ओळखले जाणारे तीर्थक्षेत्र बनेल यात शंका नाही.

**सुजित झावरे पाटील**
मा. उपाध्यक्ष, जि.प.नगर

# एकादशीनिमित्त वाळवण्यात पंढरीची अनुभूती !

## बाल दिंडीने संपूर्ण गाव भक्तिमय



सुपा : प्रतिनिधी

**आषाढी एकादशीचे औचित्य साधून वाळवणे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तसेच अंगणवाडीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या बालदिंडी सोहळयाने गावामध्ये साक्षात पंढरीची अनुभूती आली.**

चिमुकल्या वारकऱ्यांनी, त्यांचे पालक, माता-भगिनी आणि ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त सहभागाने संपूर्ण परिसर हरिनामाच्या गजरात न्हाऊन निघाला. या सोहळयाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती, मुख्याध्यापक तसेच शिक्षकवृंदांनी विशेष मेहनत घेतली. सर्व पालक, मान्यवर व ग्रामस्थांचे शाळेच्या वतीने आभार मानण्यात आले.

### विठ्ठल भक्तिचा जागर

या सोहळयात विद्यार्थ्यांनी संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत एकनाथ, संत नामदेव यांच्यासह विठ्ठल-रूख्मिणीची सुंदर रूपे साकारली. रंगीबेरंगी पोशाख, डोक्यावर टोप्या, गळयात तुळशीमाळा, हाती टाळ-मृदूंगासह वारीचा संपूर्ण अनुभव देणारा दृश्याविष्कार साकारण्यात आल. विठ्ठल नामाची शाळा भरती या भक्तिगीताने वातावरण भक्तिमय झाले होते.

### ग्रामस्थांचे सहकार्य

भक्तिच्या या उत्सवासाठी ग्रामस्थ तसेच पालकांनी मोलाचे सहकार्य केले. चिमुकल्या वारकऱ्यांसाठी खाऊचे नियोजन करण्यात आले होते. सरपंच गोरक्षनाथ दरेकर, उपसरपंच सचिनअप्पा पठारे, ग्रामपंचायत सदस्य संतोष थोरात, संपत पठारे, आकाश पठारे, सागर रोकडे, साहिल पठारे, अजय काळे, सूरज काळे यांनी मोलाचा सहभाग नोंदविला.

### भैरवनाथ देवस्थानची मदत

भैरवनाथ देवस्थान ट्रस्टच्या वतीने अध्यक्ष नितिन पठारे, सचिव चंद्रकांत पठारे, खजिनदार बापूराव थोरात, विश्वस्त रमेश दरेकर, मुकूंद पठारे यांनी खाउ वाटपासाठी पुढाकार घेतला. खाऊ हाती पडताच चिमुकल्यांचे चेहरे आनंदाने फुलून गेले.

### फुगडीचा जल्लोष आणि विठुनामाचा गजर

महिलांच्या पारंपारिक वेशभूषेतील फुगडीने सोहळ्याला वेगळीच उर्जा दिली. महिलांच्या सहभागामुळे हा उत्सव केवळ विद्यार्थ्यांपुरता मर्यादित न राहता संपूर्ण गावासाठी एक अनोखा आनंद सोहळा ठरला. विठुनामाच्या गजरात परिसर दुमदुमून गेला.

# टाळ-मृदुंगाच्या गजरात विठ्ठल नामाचा जागर!

## दिवटे पाटील इंटरनॅशनल स्कूलची भक्तिमय दिंडी पर्यावरण जागृतीचा संदेशही



सुपा : प्रतिनिधी

**आषाढी एकादशीनिमित्त वारकरी सांप्रदायाच्या भक्तिपरंपरेला उजाळा देत सुपा येथील दिवटे पाटील इंटर्नॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उत्साहात आणि भक्तिभावाने दिंडीचे आयोजन केले होते.**

विठ्ठल-विठ्ठल जय हरी विठ्ठल, ज्ञानोबा माऊली तुकाराम असा जयघोष करत टाळ-मृदुंग तसेच ढोल ताशांच्या गजरात ही दिंडी सुपा-शहाजापुर चौकातून सुपा गावामध्ये पोहचली.

या भक्तिसोहळयाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्या सुरेखा दिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेच्या शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले.

### पर्यावरण, जनजागृतीसह भक्तीचा संगम

या सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे पर्यावरण संरक्षण आणि पाणी बचतीचे संदेश हे ठरले. विद्यार्थ्यांनी झाडे लावा, झाडे जगवा, पाणी आडवा, पाणी जिरवा अशा घोषवाक्यांचे फलक हाती घेत नारे दिले. भारूडाच्या माध्यमातून पाण्याचे महत्व प्रभावीपणे पटवून दिले.

### टाळ्यांच्या गजरात दिंडीचे स्वागत

या दिंडी सोहळ्यात मेहराज पटेल याने विठ्ठलाची तर निधी शिवले हिने रूख्मिणीची वेशभूषा साकारली. आकर्षक फुलांनी दिंडीमधील माऊलींची पालखी सजविण्यात आली होती. भगव्या पताकांनी नटलेली दिंडी पाहून उपस्थितांनी विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली. गावकऱ्यांनी टाळयांच्या गजरात बाल वारकऱ्यांच्या दिंडी सोहळ्याचे स्वागत केले.

### अध्यात्माबरोबरच समाजप्रबोधन

भक्ति ही केवळ विठोबाच्या दर्शनापुरती मर्यादित नसून ती समाजहिताची दिशा देणारी उर्जा आहे हीच शिकवण या दिंडीतून अनुभवायला मिळाली. संत ज्ञानेश्वर आणि तुकारामांच्या अभंगातून जे शिकविले गेले ते केवळ अध्यात्म नसून समाज प्रबोधनाचा मार्ग आहे. या दिंडीतून याच विचारांचा प्रसार करण्यात आला.

# निघोजमध्ये विठ्ठलनामाच्या जयघोषात भक्तिरसाचा उत्सव

## भव्य दिंडी सोहळ्याचे आयोजन | ग्रामप्रदक्षिणा ; खिचडी प्रसादाचे वाटप



निघोज : प्रतिनिधी

**निघोज येथे आषाढी एकादशीनिमित्त शिवव्याख्याते अ‍ॅड. प्रा. ज्ञानेश्वर कवाद संचलित विद्याधन कोचिंग क्लासेस, श्रीराम व कन्हैय्या भजनी मंडळ, पारनेर तालुका पत्रकार संघ आणि मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. दिंडीसोहळा जय जय रामकृष्ण हरी आणि जय हरी विठ्ठलच्या नामघोषात संपूर्ण गावातून प्रदक्षिणा घालत भक्तिरसात पार पडला.**

दिंडीची सुरुवात निघोज येथील श्रीराम मंदिरात पारंपरिक पूजनाने झाली. यानंतर भाविक आणि विद्यार्थी दिंडीत सहभागी होत श्री विठोबाकडे सुख, शांती व समाधानासाठी प्रार्थना करत गावाला प्रदक्षिणा घालण्यात आली. ठिकठिकाणी ग्रामस्थांनी दिंडीचे स्वागत करत आपला सहभाग नोंदवला. योगशिक्षक सोमनाथ ढवळे आणि योगेश कवाद यांच्या मार्गदर्शनाखाली विद्याधन क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी भक्तिपर सांस्कृतिक सादरीकरण सादर केले. भजनी मंडळाच्या तालावर सादर झालेल्या या कला सादरीकरणामुळे उपस्थितांना प्रत्यक्ष पंढरपूरच्या वारीचा अनुभव मिळाल्यासारखे वाटले. ह.भ.प. रामदास कवाद, किसन थोरात, खंडु ईधाटे, भगवान भालेकर, कचरू वरखडे, बाबाजी कवाद, जयश्री साळवे, अंकुश लामखडे, जालिंदर ढवळे, पखवाजवादक बाबाजी वाजे आणि साई घोगरे यांनी मधुर अभंग गायन करून वातावरण भक्तिमय केले. या दिंडीचे नियोजन प्रा. भरत डोके, अपेक्षा लामखडे, मंदा जाधव आणि भास्कर कवाद यांनी केले. कार्यक्रमात डॉ. भास्करराव शिरोळे, खंडुजी भुकन, बबुशा वरखडे, सचिन वराळ पाटील, माऊली वरखडे, शिवाजी लंके, दत्ताजी उनवणे, बाबाजी वाघमारे, योगेश खाडे, राजुकाका देशपांडे, अनिल शेटे, राजुभाऊ लाळगे, अशोक ढवळे, पांडुरंग लंके, विष्णु लंके, भिमाजी शेटे, मोहन कवाद, गोरख पठारे, सुहास लंके, दीपक लंके, पोपट मावळे, शांताराम कवाद, दिलीप कवाद आदी मान्यवर उपस्थित होते.

श्रीराम मंदिराजवळ दिंडीचा समारोप झाला. यावेळी विठोबा-रखुमाईची पूजा-अर्चा करण्यात आली. उपस्थित भाविकांनी संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत निळोबाराय यांच्या भजनांमध्ये सामील होत प्रदक्षिणेचा भक्तिरसात समारोप केला. कार्यक्रमानंतर मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टच्या मळगंगा प्रसादालयात खिचडी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. भगवान भालेकर, किसनराव थोरात यांच्यासह भाविकांच्या लोकसहभागातून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. दिवसभरात पाचशेहून अधिक भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला.

### फुगडीच्या ठेक्याने परिसर भक्तिमय

भव्य दिंडी सोहळा निघोज गावाला प्रदक्षिणा घालून मळगंगा मंदिराजवळ आल्यानंतर भजनी मंडळाच्या गायनाच्या तालावर विद्याधन क्लासचे विद्यार्थी व भाविक भक्तांनी फुगडीचा ठेका धरून संपूर्ण परिसर भक्तिमय करून टाकला.

# पोदार लर्न स्कूलचा रिंगण सोहळा लक्षवेधी

## पारंपरिक पोशाख, लेझीम आणि टाळकरींसह विद्यार्थ्यांची दिंडी




पारनेर : प्रतिनिधी

**आषाढी एकादशीच्या निमित्ताने पारनेर येथील गुरुमाऊली पोदार लर्न स्कूल तर्फे आयोजित केलेल्या विद्यार्थी दिंडी व रिंगण सोहळ्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. पारंपरिक वेशभूषा, टाळ-मृदंगाचा निनाद, लेझीम पथकाचे सादरीकरण आणि टाळकरींच्या तालावर ठिकठिकाणी सादर केलेल्या रिंगण प्रकारामुळे वातावरण पूर्णतः भक्तिमय झाले होते.**

धोतर-उपरणं, पांढरी टोपी, डोक्याला बुक्का आणि गुलाल अशा पारंपरिक पोशाखात विद्यार्थी तर नऊवारी साडी, डोक्यावर तुळस आणि गळ्यात तुळशीमाळा परिधान करून विद्यार्थिनी या दिंडीत सहभागी झाल्या होत्या. शिव मावळे कृतज्ञता प्रतिष्ठान संचलित गुरुमाऊली पोदार लर्न स्कूलच्या या उपक्रमाने वारकरी परंपरेची सुंदर अनुभूती दिली. दिंडीची सुरुवात शाळेचे अध्यक्ष रामराव गाडेकर, सचिव मच्छिंद्र मते, प्राचार्या सौ. शिल्पा सुदामे आणि पालक वर्गाच्या हस्ते पालखी पूजनाने झाली. यानंतर श्री विठ्ठल नामाच्या घोषात आणि लेझीमच्या तालावर दिंडी मार्गस्थ झाली.

कार्यक्रमात रामराव गाडेकर यांनी श्री क्षेत्र पारनेर आणि निळोबा महाराज यांचा इतिहास आणि आध्यात्मिक श्रेष्ठत्व सांगून विद्यार्थ्यांमध्ये भक्ती आणि संस्कारांची रुजवणूक केली. त्यानंतर ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष अरविंद पाटील यांनी आपले मन स्वच्छ व हृदय भक्तीमय असेल, तर देव मदतीला धावून येतो यावर आधारित एक प्रेरणादायी गोष्ट सांगत विद्यार्थ्यांशी संवाद साधला.श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात पारनेर दर्शन घेऊन दिंडीची सांगता करण्यात आली.

# पळव्यात ज्ञानोबा-माउलींचा गजर!

## बाल वारकऱ्यांच्या भक्तिरसात पळवेकर न्हाले

सुपा : प्रतिनिधी

**आषाढी एकादशीच्या निमित्ताने पळवे खुर्द येथील श्री भैरवनाथ विद्यालयाने आयोजिलेली बालदिंडी गावभर उल्साहाचे आणि भक्तिभावाचे वातावरण निर्माण करून गेली. ज्ञानोबा माउलींच्या गजरामध्ये बाल वारकऱ्यांच्या भक्तिरसात पळवेकर न्हाउन निघाले.**

मुख्याध्यापिका वैशाली शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या दिंडीमध्ये विद्यार्थ्यांनी विठठल भक्तिचा अद्वितीय सोहळा सादर करत उपस्थितांची मने जिंकली. सकाळच्या प्रसन्न वातावरणात ज्ञानोबा-माऊली तुकारामच्या गजरात सुरू झालेल्या दिंडीने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाउन निघाला. विद्यार्थ्यांनी विठ्ठल रूख्मिणी, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर आदी संतांचा वेश परिधान केला होता.



### वारकऱ्यांनी जिंकले गावकऱ्यांचे प्रेम !

लेझीम पथकाने केलेले चपलख सादरीकरण, खांद्यावर वैष्णव पताका आणि डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन निघालेल्या बाल वारकऱ्यांनी गावकऱ्यांचे मनोमन प्रेम जिंकले. दिंडीचा समारोप पळवे बुद्रुक येथील विठ्ठल मंदिरातील दर्शनाने झाला. मंदिर परिसरात उभ्या रिंगणात ढोलांच्या तालावर वारकऱ्यांनी मनोहरी सादरीकरण केले. यावेळी विद्यार्थ्यांनी भक्तिगीतेही सादर केली.

ढोल ताशांच्या गजरात, टाळ-मृदूंगाच्या निनादात आणि हरिनाम संकीर्तनाच्या जयघोषात निघालेली ही दिंडी म्हणजे एका भक्तिमय परंपरेचे जिवंत दर्शन होते.

दिंडीच्या समारोप प्रसंगी गावातील विविध संस्थांचे पदाधिकारी, ग्रामस्थ आणि पालक मोठया संख्येने उपस्थित होते. उपस्थितांच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वितरण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांच्या भक्तिमय सहभागाचे ग्रामस्थांची कौतुक केले.

### लेझीम, अभंग सादरीकरणमुळे नवा उत्साह

पळवे बुद्रुक येथील जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक राजू आतार यांनीही या सोहळ्यात पुढाकार घेत ग्राम प्रदक्षिणेचे आयोजन केले होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या लेझीम व अभंग सादरीकरणाने दिंडीला एक नवा उत्साह दिला.

# विठुरायाच्या वारीत माणुसकीची ओंजळ !

## रविंद्र राजदेव यांचे फराळ वाटप प्रेरणादायी

नांदूरपठार : प्रतिनिधी

**आषाढी एकादशीनिमित्त नांदूरपठार येथील काळभैरवनाथ मंदिर येथून बांगरवाडी येथील विठ्ठल मंदिराकडे निघालेल्या वारकऱ्यांच्या दिंडीमध्ये सेवाभावी वृत्तीचे नीलेश लंके प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष रविंद्र राजदेव यांनी फराळाचे वाटप करून आपले सामाजिक योगदान दिले.**

बांगरवाडीच्या विठुरायाच्या दर्शनासाठी सकाळी नांदूरपठार येथून निघालेले वारकरी ऊन, पावसाच्या खेळाचा सामना करत मार्गक्रमण करत असताना चालण्यामुळे आलेला थकवा विसरून ज्यावेळी प्रत्येक वारकऱ्याच्या हाती फराळ आले त्यावेळी त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेलं समाधान आणि हास्य खरोखर दृष्ट लागावी असं होतं.

या सेवाभावी उपक्रमात राजदेव यांच्यासमवेत मा. सरपंच भानुदास आग्रे, रविंद्र घोलप, संदेश आग्रे, रामदास राजदेव, शैलेश राजदेव, आर्यन विश्वासराव, साई घोलप, बंटी घोलप, अक्षय राजदेव, रमेश पाटील घोलप, बाबाजी चौधरी, नारायण आग्रे, शशिकांत आग्रे, मयुर राजदेव हे नीलश लंके प्रतिष्ठानचे कार्यकर्ते सहभागी झाले होते.



### समाजसेवेचा प्रेरणादायी आदर्श

रविंद्र राजदेव यांची ही कृती केवळ एका दिवसाची सेवा नव्हे तर समाजाला एक शिकवण देणारी प्रेरणा आहे. दिंडीत चालणाऱ्या भाविकांची सेवा हीच खरी विठ्ठलसेवा माणून त्यांनी उन-पावसात झिजणाऱ्या हजारो पावलांमागे एक सेवकाच्या कृतीने शीतलतेचा अनुभव दिला. आजच्या काळात जिथे व्यक्तिस्वार्थ वाढतो आहे, तिथे अशी निःस्वार्थ सेवा आणि भक्तिभावाने केलेले कार्य समाजाला नवा उजाळा देतात. पंढारीच्या वारीतील या सेवाभावी कार्याची नोंद समाजानेही घेतली पाहिजे आणि ही परंपरा पुढच्या पिढयांपर्यंत पोहोचविली पाहिजे. विठ्ठलाच्या खरा मार्ग हा भक्ती आणि सेवेच्या रस्त्याने जातो आणि रविंद्र राजदेव यांचा हा उपक्रम त्याचा मार्गाचा आदर्श ठरतो.

**खासदार नीलेश लंके**, लोकसभा सदस्य

### सेवा हीच खरी पूजा

रविंद्र राजदेव हे केवळ फराळाचे वितरण करून थांबले नाहीत तर त्यांनी स्वतः दिंडीत सहभागी होत वारकऱ्यांसोबत चालत वारकरी बनूनच विठ्ठलाच्या चरणी ते नतमस्तक झाले. भक्तिभावाने केलेली ही सेवा पाहून अनेक वारकऱ्यांनी त्यांचे कौतुक करत त्यांच्या या सेवाभावासाठी शुभेच्छा दिल्या. राजदेव यांचे हे केवळ सामाजिक योगदान नव्हते तर हृदयातून उमटलेली माणुसकीची ओंजळ होती.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com